दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २५२ वा | शनिवार दि. ८ जुलै २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## राज ठाकरे यांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट



**मुंबई ।** गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात मोठ्या नाट्यमय घडामोडी पाहायला मिळत आहे. २ दिवसांपासून शिवसेना ठाकरे गट आणि-मनसेची युती असल्याची चर्चा समोर येवू लागल्या होत्या. त्यानंतर आत्ता सर्वात मोठी बातमी समोर येत असून मनसे अध्यक्ष राज ठाकरे एकनाथ शिंदे यांच्या भेटीला गेले आहेत.महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या अनेक घडामोडी घडत आहेत. उलट-सुलट चर्चा सुरु झाल्या आहे.

## न्यूज कॉलम

### लाचखोर तलाठ्या विरोधात गुन्हा दाखल

**नाशिक ।** सातबारा उताऱ्यावर नोंद करून देण्याच्या मोबदल्यात २० हजार रुपयांची लाच घेणाऱ्या तलाठी सचिन काशीनाथ म्हस्के (३८, रा. तपोवन लिंक रोड) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, घोटी येथील तक्रारदाराने इगतपुरी तालुक्यातील मुरंबी गावात शेती खरेदी केली. त्यानुसार सातबारावर नाव लावण्यासाठी त्यांनी म्हस्केशी संपर्क साधला. त्यावेळी त्याने २० हजार रुपयांची लाच मागितली.

### वीज चोरी करणाऱ्या कारखानदारांवर गुन्हा

**मालेगाव ।** यंत्रमाग कारखान्यात बनावट वीज मीटर बसवून तसेच वीज मीटर मध्ये फेरफार करीत सुमारे अडीच लाख रुपयांची वीज चोरी करणाऱ्या दोघा यंत्रमाग कारखानदारांविरुद्ध पवारवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील फार्मसी नगर भागात मालेगाव पावर सप्लाय कंपनीच्या पथकाने दोघा यंत्रमाग कारखान्यांवर छापे मारत ही वीज चोरी उघडकीस आणली आहे. वीज मीटर मध्ये फेरफार करत एक लाख ३३ हजार २८२ रुपयांची ही चोरी केल्याचे पथकाने केलेल्या तपासणी उघडकीस आले होते.

# राष्ट्रवादीत कोणतीही बंडखोरी नाही, पक्ष आमचाच : पटेल

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादीची गुरूवारी झालेली बैठक ही अनधिकृत होती, त्या बैठकीला कोणताही अर्थ नाही असा दावा खासदार प्रफुल्ल पटेल यांनी केला. काही लोकांकडून चुकीची माहिती पसरवली जात असून त्यामाध्यमातून संभ्रम निर्माण केला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. पक्षाचे बहुतांश आमदार आणि खासदार हे आपल्यासोबत असून पक्ष आपलाच असल्याचा दावा प्रफुल्ल पटेल यांनी केला.

खासदार प्रफुल्ल पटेल म्हणाले की, खरी परिस्थिती तुम्हाला कळावी यासाठी आम्ही समोर आलो आहोत. ३० जूनला राष्ट्रवादीची महत्त्वाची बैठक झाली, त्यात अनेक लोक उपस्थित होते. बैठक देवगिरीवर झाली होती. अनेक आमदारही यावेळी उपस्थित होते, बहुतांश पदाधिकारी होते, कार्यकर्ते होते. त्यावेळी सर्वानुमते अजित पवारांना आपला नेता म्हणून घोषित करण्यात आले. त्यानंतर दोन-तीन गोष्टी करण्यात आल्या. त्यानंतर प्रफुल्ल पटेल यांना कार्यकारी अध्यक्ष म्हणून घोषित करण्यात आलं. विधानसभा अध्यक्षांना अजित पवार गटनेते आहेत असं सूचित करण्यात आलं. अनिल पाटील प्रतोद असतील असंही सूचित करण्यात आलं. विधानपरिषदेच्या सभापतींनाही अमोल मिटकरी हे परिषदेतील प्रतोद असतील असं सूचित करण्यात आलं. त्याच दिवशी निवडणूक आयोगाला आमदार आणि सदस्यांच्या प्रतिज्ञापत्रांसह अर्ज देण्यात आला. निवडणूक आयोगापर्यंत हा विषय पोहोचलेला आहे. आम्ही राष्ट्रवादी पक्ष आहोत, त्यामुळे आम्हाला नाव आणि चिन्ह मिळालं पाहिजे अशी मागणी आयोगाला केली अशी माहिती खासदार प्रफुल्ल पटेल यांनी दिली. पक्षाचं बहुमत अजित पवारांच्या पाठिशी असल्याचा अर्ज आम्ही ३० जूनला दाखल केला असल्याची माहिती त्यांनी दिली. राष्ट्रवादीतील परिस्थिती सर्वांसमोर आहे. ३० तारखेला देवगिरी बंगल्यावर बैठक झाली. या बैठकीला बहुसंख्येने पक्षाचे नेते, कार्यकर्ते आणि आमदार उपस्थित होते. या बैठकीत अजित पवार यांची सर्वानुमते नेता म्हणून निवड करण्यात आली. यानंतर अजित पवार यांनी माझी कार्यकारी अध्यक्ष म्हणून निवड केल्याचे प्रफुल्ल पटेल यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.



### पवार यांच्या नेतृत्वातील बैठक अवैध

दिल्लीत झालेली राष्ट्रवादीची बैठक अनधिकृत असल्याचा दावाही प्रफुल्ल पटेल यांनी यावेळी केला. यावेळी बोलताना शिवसेनेच्या राजकीय पक्षाच्या दावेदारीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या टिप्पणीचा दाखलाही प्रफुल्ल पटेल यांनी वाचून दाखवले. राजकीय पक्ष आणि विधीमंडळ पक्ष एकमेकांशी जोडलेले असल्याचे म्हणणे चुकीचे असेल असे प्रफुल्ल पटेल यांनी सांगितले. आम्हाला कुठल्या पक्षात विलीन व्हायचे असेल तो भाग पूर्ण वेगळा आहे. पण पक्षांतर्गत जर काही असेल तर ते सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार थांबवता येत नाही.

### ३० तारखेलाच निवडणूक आयोगाकडे अर्ज

याच दिवशी म्हणजे ३० तारखेलाच दिल्लीत मुख्य निवडणूक आयोगात एक याचिका दाखल करत आम्हाला असे काम करायचे असून पक्षाचे नाव आणि चिन्ह आमच्याकडेच रहावे अशी विनंती आम्ही प्रतिज्ञापत्रांसह केली आहे.

### त्यांना बैठकीचाच अधिकार नाही

बैठकीसंदर्भात, पहिली गोष्ट बैठकीचाच अधिकार त्यांना नाही. त्यामुळे कारवाईबद्दल वेगळे सांगण्याची गरज नाही असे ते म्हणाले. आम्ही सर्वजण अधिकृत असून आमच्या याचिकेनुसार आमच्याकडे बहुमत आहे. निवडणूक आयोगाच्या निकषात आम्ही बसतो. आमच्याविरोधातील कारवाई अवैध आहे असेही पटेल म्हणाले. आम्ही कायदा किंवा तांत्रिक बाजूने काहीही चुकीचे केलेले नाही. आमच्याविरोधात कोणतीही कारवाई केली जाऊ शकत नाही असेही पटेल म्हणाले.

### राजकीय पक्षाचा निर्णय आयोग घेईल

राजकीय पक्ष कोण आहे याचा निर्णय निवडणूक आयोग घेईल. तर विधीमंडळ पक्षासंदर्भात निर्णय विधानसभा अध्यक्ष घेतील असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितल्याचे प्रफुल्ल पटेल म्हणाले. निवडणूक आयोगाकडे ३० तारखेला अजित पवार यांनी याचिका दाखल केली आहे अशी माहितीही पटेल यांनी दिली आहे.

# दलित-मुस्लिम अत्याचाराविरोधात वंचितची भर पावसात निदर्शने



प्रशासनाला निवेदन सादर

**धुळे । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात वाढत चाललेल्या दलित, मुस्लिम, ओबीसी अत्याचारांच्या बाबतीत चौकशी करून गुन्हेगारांना कायदेशीर शिक्षा देण्यात यावी व पीडित, अन्यायग्रस्त लोकांना न्याय देण्यात यावा अशी मागणी करीत वंचित बहुजन आघाडीच्या वतीने धुळे शहरातील जल रोडवरील क्युमाईन क्लबसमोर शुक्रवारी भर पावसात निदर्शने करण्यात आली. वंचितच उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष रविकांत वाघ, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष आबासाहेब खैरनार, जिल्हाध्यक्ष अरविंद निकम, जिल्हा संघटक शंकर खरात यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन झाले. यात मुस्लिम समाजाचे पदाधिकारी व कार्यकर्तेही सहभागी झाले होते. आंदोलनानंतर उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे यांना मागण्यांचे निवेदनही सादर करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रात गेल्या ८-९ वर्षांपासून दलित, मुस्लिम, ओबीसी समाजावर सातत्याने मनुवादी व्यवस्थेकडून वारंवार अन्याय, अत्याचार, क्रूर हत्या, बलात्कारसारखे प्रकार वाढत चालले आहेत. या राज्यात दलित, मुस्लिम, ओबीसी भयावह परिस्थितीत जीवन जगात आहेत. ते न्याय मागण्यासाठी पोलीस स्टेशन किंवा इतर लोकप्रतिनिधींकडे जाऊन सुद्धा त्यांना न्याय मिळत नाही. त्याउलट पोलिसांमार्फत मनुवादी लुक या लोकांना धमकावतात. त्यांच्यावर उलट खोटे आरोप करून या लोकांना ३९५ सारख्या गुन्ह्यांमध्ये अडकविण्यात येते.

औरंगजेब, टिपू सुलतान यांचे स्टेटस ठेवले म्हणून मुस्लिमाना धमकावत दंगली घडविल्या जात आहेत. परळी येथे जरीन खान नामक व्यक्तीला पोलीस लॉकअपमध्ये पोलिसांकडूनच अत्याचार करून जीवे ठार मारले जाते. अमळनेर येथे सुद्धा अशोक सलीम शेख या युवकास देखील पोलीस लॉकअपमध्ये मारहाण करून जीवे मारण्यात आले. अशा पद्धतीने पोलिसांकडून सुद्धा भेदभाव करून अत्याचार करण्यात येतात. त्या पोलिसांवर कुठलीही कारवाई केली जात नाही. त्यांना निलंबित करण्यात येत नाही. अशा अनेक घटना राज्यात घडत आहेत. या गुन्ह्यांमधील दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी असे निवेदनात नमूद केले आहे. निवेदनावर रविकांत वाघ, आबासाहेब खैरनार, अरविंद निकम, शंकर खरात, सीताराम वाघ, चंद्रमणी वाघ, सिरातल खाटीक, मुन्ना सरकार, मुस्तकीम खान, रहीम पटेल, शाबान अन्सारी, आकाश बागुल, भरतसिंग राजपूत, महेंद्र बोरसे, मक्कन माणिक, चंद्रकांत मोरे, सागर चव्हाण, अमोल पवार, दीपक सोनवणे, शरद वाघ, रघु खोपे, नितीन बैसाणे यांच्या सह्या आहेत.

# चारित्र्याच्या संशयावरून पतीकडून पत्नीची हत्या

### पतीनेही गळफास घेत संपवलं जीवन; दोन मुलं झाली पोरकी

**धुळे । प्रतिनिधी**

तालुक्यातील कुंडाणे, वेल्हाणे येथे बुधवारी मध्यरात्रीनंतर पतीने पत्नीचा खून करत नंतर स्वतः आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात पतीवर खुनाचा गुन्हा दाखल झाला आहे. पतीने आपल्या पत्नीला अनैतिक संबंधाच्या संशयावरून जबर मारहाणी केली. पतीने प्रथम पत्नीचे दात पाडून त्यानंतर हात मोडून तिला बेदम मारहाण केली. त्यानंतर तिला ठार केले. त्याने चिठ्ठीत काही कारणे नमूद करून स्वयंपाकघरात स्लॅबच्या कडीला गळफास घेत आत्महत्या केली. या घटनेची कुंडाणे गावात गंभीर चर्चा आहे. या प्रकरणी सखोल चौकशीची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, घरगुती कारणासह चारित्र्याच्या संशयावरून पती जितेंद्र बालू सोनवणे (३०) याने पत्नी प्रतीक्षा जितेंद्र सोनवणे (२५) हिचा खून केला. नंतर स्वतः आत्महत्या केल्याचा गुन्हा दाखल झाला आहे. या दांपत्याला तीन वर्षांचा मुलगा आणि पाच वर्षांची मुलगी आहे. त्याच्या आत्महत्येमागचे मूळ कारण पोलिसांनी शोधावे तसेच खुनाचे आणि त्यांच्या आत्महत्येस कारणीभूत संशयितांचा शोध घेऊन त्याला अटक करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे. आत्महत्येपूर्वी जितेंद्रने मुंबईतील भाऊ गणेश



(३५) यास मुलांचा सांभाळ कर, असा मोबाईवर मेसेज पाठविला. तो गणेशने पहाटे पाचनंतर पाहिला. त्याने संपर्क केल्यानंतर जितेंद्रच्या मुलीने घडलेली घटना सांगितली. जितेंद्रचे आई-वडील बदलापूर येथे मोठ्या मुलाकडे गेले होते. मृत जितेंद्रने आत्महत्येपूर्वी लिहिलेली चिठ्ठी, काही व्हिडिओ क्लिप, मेसेज संशयास्पद आहेत. त्याची चौकशी करून या दांपत्याच्या आत्महत्या किंवा टोकाचे पाऊल उचलण्यास प्रवृत्त केलेल्या संशयितांचा पोलिसांनी शोध घ्यावा, अशीही मागणी आता होत आहे.

दरम्यान कुंडाणे गावात जितेंद्र सोनवणेचे घर सकाळी साडेसहा ते सातपर्यंत बंद असल्यामुळे शेजारच्यांनी आवाज दिला. मात्र, प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे ग्रामस्थांनी पोलीस पाटलांना याची माहिती दिली. त्यांच्यासह ग्रामस्थांनी दरवाजा तोडून घरात पाहिले असता सोनवणे दांपत्य गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आले या प्रकरणी कैलास श्यामराव पाटील यांच्या फिर्यादीनुसार धुळे तालुका पोलिस ठाण्यात मयत पती जितेंद्र सोनवणे यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला.

# ‘शासन आपल्या दारी’ उपक्रमाचा धुळे जिल्ह्यात चित्ररथाद्वारे जागर

### जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या हस्ते शुभारंभ


**धुळे । प्रतिनिधी**

'शासन आपल्या दारी' अभियानांतर्गत धुळे येथे जिल्हास्तरीय कार्यक्रम सोमवार, १० जुलै, २०२३ रोजी दुपारी २.३० वाजता मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत एसआरपीएफ मैदान, धुळे येथे होणार आहे. ‘शासन आपल्या दारी’ अभियानाची माहिती जनसामान्यापर्यंत एलईडी चित्ररथामार्फत पोहचविण्यात येत आहेत. या चित्ररथास आज जिल्हाधिकारी श्री. शर्मा यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करण्यात आला.

या चित्ररथाचे जिल्हाधिकारी श्री. शर्मा यांच्या हस्ते फित कापून उद्घाटन करण्यात आले. यावेळी अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण, निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावडे, भूसंपादन अधिकारी तुकाराम हुलवळे, जिल्हा पुरवठा अधिकारी महेश शेलार आदि उपस्थित होते.

जिल्हाधिकारी म्हणाले की, ‘शासन आपल्या दारी’ अभियांनातर्गत धुळे जिल्ह्यात सोमवार १० जुलै, २०२३ रोजी दुपारी २.३० वाजता राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत एसआरपीएफ मैदान, धुळे येथे कार्यक्रम होणार असून या कार्यक्रमास १२ हजारापेक्षा जास्त लाभार्थी तसेच जवळपास ३० हजारापेक्षा अधिक नागरिक उपस्थित राहण्याचे नियोजन प्रशासनाने केले आहे. या कार्यक्रमास जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत चित्ररथाव्दारे चारही तालुक्यात जनजागृती करण्यात येत आहेत. धुळे येथील आयोजित मुख्य कार्यक्रमास जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे. असे आवाहनही श्री. शर्मा यांनी यावेळी केले. या चित्ररथाव्दारे आज शिरपूर येथे, ८ जुलै, २०२३ रोजी शिंदखेडा, ९ जुलै, २०२३ रोजी साक्री तसेच १० जुलै, २०२३ रोजी धुळे येथे जनजागृती करण्यात येणार आहे.

# सातपूर, अंबड एमआयडीसी परिसर गुन्हेगारमुक्त करण्यावर विशेष भर देणार : एसीपी देशमुख



### निमात सत्कार सोहळा: वाघ, भालेराव यांचाही सन्मान

**नाशिक । प्रतिनिधी**

सातपूर आणि अंबड परिसरातील उद्योजक व कामगार यांच्या हितासाठी निमा बरोबर हातात हात घालून काम करणार आणि हा परिसर गुन्हेगारमुक्त व कायदा सुव्यवस्था पूर्ण करण्यावर विशेष भर दिला जाईल, असे आश्वासन नूतन सहाय्यक पोलीस आयुक्त शेखर देशमुख यांनी दिले.

नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर असोसिएशन (निमा) तर्फे अंबड विभागाचे नवनियुक्त सहाय्यक पोलीस आयुक्त शेखर देशमुख, अंबडचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद वाघ, सातपूरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंकज भालेराव यांच्या सत्कार सोहळा पार पडला. त्यावेळी सत्कारास उत्तर देताना देशमुख बोलत होते. सातपूर आणि अंबड औद्योगिक वसाहत परिसरात उद्योजक आणि कामगार यांच्यातील प्रश्न सोडविण्यासाठी समन्वय समिती स्थापन करण्याची उद्योजकांची जी मागणी आहे त्याला पोलीस आयुक्त यांनी तत्वतः मान्यता दिली. त्याचा पाठपुरावा करण्याचे आश्वासन यावेळेस देशमुख यांनी दिले. तसेच हे प्रश्न सोडवण्यासाठी निमातर्फे केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचे देशमुख यांनी कौतुक केले. गुन्ह्यांची त्वरित उकल व्हावी यासाठी उद्योजकांनी रस्त्यावरच्या बाजूलाही सीसीटीव्ही लावावेत. मजूर ठेकेदारांकडून पुरविल्या जाणाऱ्या कामगारांचा तपशीलवार डेटा उद्योजकांनी ठेवावा. ठेकेदारांकडून कामगारांचे शोषण होणार नाही याची काळजी घ्यावी. महिला कामगारांचे हित जोपासण्याची यंत्रणा कार्यान्वित करावी व विशाखा समित्यांची स्थापना झालेली आहे का नाही? याचीही काळजी घ्यावी आदी अपेक्षाही देशमुख यांनी व्यक्त केल्या.

कार्यक्रमास निमाचे उपाध्यक्ष किशोर राठी, आशिष नहार, श्रीधर व्यवहारे, कोषाध्यक्ष विरल ठक्कर, एस.के.नायर, किरण वाजे, जयंत जोगळेकर, मिलिंद राजपूत, मनीष रावल, राजेंद्र वडनेरे, गोविंद झा, संदीप भदाने, नितीन वागस्कर, किरण खाबिया, प्रविण वाबळे, श्रीकांत पाटील, शशांक मणेरीकर आदींसहित निमा कार्यकारिणीचे सदस्य उपस्थित होते.

# ठाकरे गटाला मोठा धक्का, नीलम गोऱ्हेंचा मुख्यमंत्री शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश

**मुंबई । प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे यांना आणखी एक मोठा धक्का बसला आहे. विधान परिषदेच्या उपसभापती तसेच ठाकरे गटाच्या प्रवक्त्या नीलम गोऱ्हे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. या प्रवेश सोहळ्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील उपस्थित होते. उद्धव ठाकरे यांच्यासाठी हा मोठा धक्का मानला जातोय.

महिलांच्या प्रश्नावर तसेच इतर सामाजिक प्रश्नावर सातत्याने आवाज उठवणारा, स्वच्छ चेहरा, म्हणून नीलम गोऱ्हे यांची ओळख आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या विश्वासू कार्यकर्त्या म्हणूनही त्यांना ओळखले जात होते. एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर नीलम गोऱ्हे या सातत्याने ठाकरे गटाची बाजू मांडत होत्या. मात्र, आता नीलम गोऱ्हे यांनी शिंदे सेनेत प्रवेश केला आहे. राज्यातील राजकीय पार्श्वभूमीवर हा उद्धव ठाकरे यांच्या गटाला हा मोठा धक्का मानला जातोय. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना योग्य मार्गावर जात आहे. महिला विकास, महाराष्ट्र आणि देश विकासाच्या प्रश्नांवर एकनाथ शिंदे यांच्यासोबत आणि देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्याने काम करण्याचा निर्णय घेतला असल्याचं गोऱ्हे म्हणाल्या. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या मार्गदर्शनानुसार शिवसेना पक्षात १९९८ मध्ये प्रवेश केला. शिवसेनेत मला चांगलं काम करता आलं. सद्यस्थितीत सुप्रीम कोर्ट आणि निवडणूक आयोगाने स्पष्ट निकाल दिला आहे, की एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनाच अधिकृत आहे. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत शिवसेनेचं समर्थन करते, असं नीलम गोऱ्हे म्हणाल्या. नीलन गोऱ्हे यांनी जवळपास २५ वर्षांपूर्वी बाळासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेत प्रवेश केला होता. तेव्हापासून त्यांनी वेळोवेळी शिवसेनेची बाजू मांडली आहे. त्यांनी महिलांसाठी मोठं कामही केलं आहे. निष्ठावान शिवसैनिक म्हणून नीलम गोऱ्हेंकडे पाहिलं जातं. इतकी वर्ष ठाकरेंसोबत असलेल्या नीलम गोऱ्हे यांनी मुख्यमंत्री शिंदेंच्या गटात प्रवेश केल्यानंतर ठाकरे गटासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

### सुषमा अंधारेंवर टीका

नीलम गोऱ्हे यांनी शिंदे सेनेत प्रवेश केल्यानंतर ठाकरे गटाच्या सुषमा अंधारे यांच्यावर नाव न घेता टीका केली. सटरफटर लोकांमुळे मला नाराज होण्याचे कारण नव्हते. हीच खरी बाळासाहेबांची शिवसेना असल्याने आपण शिवसेनेत प्रवेश केला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



### विरोधी पक्ष नेत्यांनी फेटाळला होता दावा

मला तरी वाटत नाही की, नीलम गोऱ्हे या शिंदे सोबत जातील, त्या ठाकरे गटातच राहणार असल्याचे मत विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी व्यक्त केले होते. नीलम गोऱ्हे कुठेही जाणार नाहीत, त्या ठाकरे गटांसोबतच राहतील असा दावा देखील विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी केला होता.

# दुचाकीवर बसवून निर्जनस्थळी नेत महिलेवर बलात्कार, एकास अटक

**धुळे । प्रतिनिधी**

दोंडाईचा तालुक्यातील अंजनविहिरे येथील हातमजूरी करणाऱ्या महिलेस बसमध्ये बसवुन देतो असे सांगत दुचाकीवर बसवुन चिमठाणा रस्त्यावरील निर्जनस्थळी नेत दोघा नराधमांनी सामुहिक बलात्कार केल्याची घटना दि.५ जुलै रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास घडली.

पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, दि.५ जुलै रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास एका इसमासोबत दुचाकीवरून जात असतांना त्यांची दुचाकी अन्य दोघा तरूणांनी अडविली. त्यानंतर महिलेसोबत असलेल्या इसमास दुचाकीवरून आलेल्या दोघा तरूणांनी शिवीगाळ करून मारहाण केली तसेच त्यास पळवून लावले. त्यानंतर 'तुला बसमध्ये बसवुन देतो, असे सांगुन दुचाकीवर बसविले व चिमठाणारोड लगत लाईट टॉवर जवळील निर्जनस्थळी नेत दोघांनी सामुहिक बलात्कार केला.या फिर्यादीवरून शिंदखेडा पोलीस ठाण्यात दोघा तरूणांवर भादंवि कलम ३७६,३७६ (ड), ३४१,५०६,३४ प्रमाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आली. दरम्यान, गुन्हा दाखल झाल्यानंतर यातील पंकज संजय पवार (२९) रा.वरझडी यास पोलिसांनी ताब्यात घेतले असून अन्य आरोपीचा तपास सुरू आहे.

## पक्ष कोणाचा?

गेल्या नऊ वर्षांत राष्ट्रवादी काँग्रेसची भाजपबरोबर तीन वेळा चर्चा झाली; पण ती निष्फळ ठरल्याचे दु:ख व राग अजित यांना आहे. सत्तेच्या आकांक्षेने त्यांनी आपला पक्ष फोडण्याचे धाडस केले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन गटांच्या शक्ती प्रदर्शनातील पहिली फेरी अजित पवार यांनी जिंकल्याचे दिसत आहे. मुंबईत त्यांच्या मेळाव्यास २९ आमदार उपस्थित असल्याचे वृत्त आहे. काही बातम्यांत ही संख्या ३२ असल्याचे म्हटले आहे. म्हणजे थोडी अनिश्चितता आहे. पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या मेळाव्यास १६ आमदार उपस्थित होते, असे प्रसिद्ध झाले आहे. विधानपरिषदेचे किती सदस्य आणि किती खासदार कोणाच्या बाजूने आहेत याविषयी अजूनही अस्पष्टता आहे; पण अजित पवार गटाने एकूण बहुमताचा दावा केला आहे. शरद पवार अजूनही आपले आदर्श आहेत, असे म्हणत अजित पवार यांनी शरद पवार यांच्यावर तुफान टीका केली. २०१४, २०१७ व २०१९ मध्ये भारतीय जनता पक्षाबरोबर सरकार स्थापन करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने चर्चा केली होती; पण ती फळास आली नाही, असे सांगताना अजित यांनी त्या चर्चेचे काही तपशील जाहीर केले. तेव्हा सत्तेत वाटा न मिळाल्याचा राग अजित यांना आलेला दिसतो. तो त्यांनी प्रकट केला. त्यांनी मांडलेल्या मुद्द्यांचा शरद पवार यांनी प्रतिवाद केला नाही. भाजपवर सतत टीका करूनही त्याच पक्षाबरोबर हातमिळवणी करण्याचा तोही तीन वेळा प्रयत्न राष्ट्रवादी काँग्रेसने का केला याचे उत्तर मिळत नाही. आता या पक्षाचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

मतदारांचा विचार नाही

१९७८ मध्ये शरद पवार यांनी वसंतदादा पाटील यांचे सरकार पाडल्याची आठवण अजित यांच्या मेळाव्यात निघणे अपरिहार्य होते. अजित यांनी भाजपचा हात धरण्यापूर्वीच पक्षाध्यक्षपदावरून त्यांनी शरद पवार यांची हकालपट्टी केली होती, हे त्यांच्या मेळाव्यात उघड झाले. गेल्या वर्षीच्या मार्चपासून अजित भाजपच्या संपर्कात होते हे समोर आले आहेच. मागील महिन्यात शरद पवार यांनी पक्ष संघटनेत काही बदल केले. प्रफुल्ल पटेल व कन्या सुप्रिया सुळे यांना त्यांनी कार्याध्यक्ष नेमले. नव्या रचनेत अजित यांना कोणतीच भूमिका दिली नव्हती. बहुधा तेव्हाच त्यांनी पक्ष सोडण्याचे निश्चित केले असावे. पटेल, छगन भुजबळ व अन्य शरद पवार यांचे निकटचे मानले जाणार्या नेत्यांनाही त्यांनी आपल्याकडे ओढले, महिना अखेरीस त्या गटाने पक्षाचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार यांनाच पक्षाबाहेर काढले. हे सर्व होत असताना शरद पवार यांच्यासारख्या मुरब्बी राजकारण्यास त्याची गंधवार्ताही लागू दिली नाही, यातून अजित यांचे राजकीय कौशल्य व्यक्त होते. आता त्यांनी पक्षाचे नाव व चिन्ह यावर दावा केला आहे. पक्षाचे चिन्ह कोठेही जाणार नाही, असे शरद पवार म्हणाले. त्याचबरोबर चिन्ह भवितव्य ठरवत नाही, असेही म्हणाले. कदाचित आपण चिन्ह गमावू अशी त्यांनी अप्रत्यक्ष कबुली दिली असा त्याचा अर्थ घ्यायचा का? पक्ष चिन्ह आपल्याकडे कायम राहावे यासाठी तेही निवडणूक आयोगाकडे जाणार आहेतच. आता आमदार, खासदार यांची मोजदाद होईल. विधिमंडळ पक्ष मोठा की मूळचा पक्ष मोठा? या प्रश्नावर खल होईल. पक्षांतर बंदी कायद्याच्या कचाट्यातून निसटण्यासाठी अजित गटास ३६ आमदारांची गरज आहे. तेही एकाच सभागृहात असणे आवश्यक आहे. जर ती संख्या गाठली गेली नाही, तर या गटाचे भवितव्य काय? हा प्रश्नही कायम आहे. अजित यांचे बंड म्हणजे प्रादेशिक पक्ष संपवण्याच्या भाजपच्या योजनेचा एक भाग असू शकतो. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांच्या सहकार्यांच्या पात्रतेचा निकाल काय येतो, राष्ट्रवादीत कोणता गट सरस ठरतो या समस्या आहेत. समजा राज्यात लवकर निवडणूक घेण्याची वेळ आली, तर भाजप या दोन्ही गटांना किती महत्त्व व जागा देणार? हा प्रश्न जास्त महत्त्वाचा आहे. मतदारांनी शिवसेना व राष्ट्रवादी या पक्षांकडे बघून संबंधितांना निवडून दिले होते. ते मत भाजपच्या विरोधात होते. भाजपशी हातमिळवणी करताना या गटांना मतदारांच्या मताचा विसर पडलेला दिसत आहे. राजकारणात सत्ता हीच महत्त्वाची असते; पण विरोधक या नात्यानेही मोलाची भूमिका बजावता येते. सध्या भाजपला विरोधक नको आहेत आणि अजित यांना सत्ता हवी आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष कोणाचा? हा प्रश्न निर्माण झाला आहे.

## कृष्णमनोगत आणि गवसलेला कृष्णस्पर्श!

पुस्तक वाचताना काही ठिकाणी आपणं स्तंभित होऊन जातो... काही ठिकाणी डोळे पाणावतात... काही वेळा हृदय हेलावतं... यशस्वी जीवनाची मंत्रे, जीवन जगण्याची तंत्रे, ध्यानाची सुत्रे पावलोपावली, काहीतरी नव्हे खुप काही अगदी सहजपणे देऊन जातात.... देणारा विलक्षणं जबरदस्त आहे.. देणार्याने भरभरुन दिले आहे... किंबहूना आपली ओंजळ कमी पडते... कृष्णमनोगता विषयी बोलू तितकं कमी आहे... कितीही बोललं, तरी खुप काही राहिलं आहे...बाकी आहे असंच वाटत राहतं... किंबहूना या ही पुढे जाऊन असं म्हणावं लागेल की या पुस्तकाचं समीक्षण होऊच शकत नाही.. याचं चिंतन झालं पाहिजे... आत्मसात झाले पाहिजे...

कृष्णमनोगत कथन करते वेळी मैत्रेयजींवर नक्की अगदी नक्कीच कृष्णाने भरभरुन कृपा आशिर्वादाची बरसात केलेली असणार आहे... त्याशिवाय का नितांत सुंदर कलाकृतीची निर्मीती होईल ? अस्तित्वाचे रहस्य जाणणार्या, अस्तित्वावर प्रेम करणार्या या संत विभूतीस अस्तित्वाचे ही सहयोग मिळाल्याचे दिसून येत आहे... त्या खेरीज अशी अद्भूत निर्मीती होणे शक्यच नाही... कारण आपणं जेव्हा कृष्णमनोगतात कृष्णा समवेत वावरतो कुठेही आपल्याला अवाजवीपणा, खोटेपणा, अतिशयोक्ती आढळत नाही... हे खरं असेलं का? अशी शंका कुठेही उपस्थित होत नाही... याऊलट जागोजागी वॉव-फॅक्टर मात्र निश्चित भेटतो... या सार्याची गंमत वाटते... युगे नी युगे ऊलटलीत त्या काळचा ईतिहास चलतचित्रपटा प्रमाणे आपल्या डोळ्यासमोर ऊभा ठाकतोय... कृष्ण जन्मावेळी तर झालेच चमत्कार पण कृष्णमनोगताच्या पार्श्वभूमीवर ही वातावरण भारावून जाते...


कृष्णमनोगत ही कादंबरी नव्हेच... हा चमत्कार म्हणावा लागेल... हा निव्वळ आणि निव्वळ साक्षात्कार आहे... कृष्ण भेटीचा साक्षात्कार म्हणा ना!!

स्वामी मैत्रेयजीं विषयी काय बोलावे ?
दिव्यत्वाची जेथे प्रचिती तेथे कर माझे जुळती !
कृष्णमनोगत जो भी पढ लेगा !
कृष्ण बनकर जी लेगा....!

गिनती आपण करु शकत नाही काळ ईतुका लोटला.... कृष्ण मात्र प्रत्येकाच्या अंतरंगी आहे तसाचं राहिला ! अगदी तसेचं कृष्णमनोगत ही मैत्रेयजींची कलाकृती कालजयी होणारं...यात तिळमात्र शंका नाही.. कृष्णमनोगतून कृष्ण प्रतिमा अधिकाधिक स्पष्ट होते असे नाही तर आणखिन प्रितीकर होते... तितक्याच सहजपणे आपली होते... लेखकाने कादंबरीत आपला प्राण ओतलाय.... इतकेच नव्हे तर त्यांचे असिम ज्ञान आणि गहन ध्यानसाधनेची, संतत्वाची चुणूक दिसून आल्याशिवाय राहत नाही... असे वाटते परत कान्हानेचं जणू बासुरीत फुंकर मारलीय... पुन्हा नव्याने जणू राधेला शिळ घातलीय... आपले मन घर आंगण वृंदावन होऊन जातं...!

कृष्णमनोगत हिमालयाची उंची गाठेल की नाही माहीत नाही पण आकाशाला गवसणी घालणार, अंतरंगाला साद घालणार, प्रत्येकातील मी पण हरवणार, प्रत्येकाच्या आतील कृष्ण जागा करणार... फक्त मैत्रेयजीं साठीच नव्हे तर प्रत्येक वाचकासाठी जबरदस्त माईलस्टोन ठरणार..! फक्त जीवनमंत्र देणार असे नव्हे तर नवदृष्टी देणार...! कृष्ण मुखातून मैत्रेयजी वदून जातात, प्रेम जगता आले पाहिजे, जीवन जगता आले पाहिजे. या गोष्टी केवळ बुद्धीनं समजून घेतल्या म्हणजे समजल्या असं होतं नाही. सौंदर्य शब्दांत नाही, चित्रात नाही, ते अनुभवण्यात आहे. जीवन असिम आहे, अनंत आहे, बहुआयामी आहे. त्याला शब्दांत बांधण वेगळे आहे.

जीवनाचा आस्वाद घेणं वेगळं आहे. आणि त्याची व्याख्या करणार तरी कशी? जीवन शब्दांत थोडं प्रवाहित होत ? ते श्वासात आहे, हृदयात आहे, डोळ्यात आहे, देहात आहे, प्रकृतीत आहे, शब्दांत नाही... शब्दांत नाही... असं कथन करणारे मैत्रेयजीं कृष्णमनोगत सारखी ६७२ पानांची कादंबरी अगदी सहजतेने शब्दबध्द करुन जातात... खरचं अगदी खरचं हे सारं सारं शब्दातीत आहे..आमच्या सारखे वाचक समिक्षणासाठी तोकडे पडतात....या कादंबरीचे समिक्षण होणं म्हणजे आकाशाला मुठीत बांधण्या सारखं आहे.




ही कादंबरी समिक्षणा पलीकडीलं आहे... कादंबरी संपते...पण कृष्ण आपल्या भोवती रुंजी घालत राहतो....तो आपली पाठ सोडत नाही अर्थातच हे लेखकाच्या लिखाण शैलीचे वैशिष्ट्य आहे... महाभारतातील कृष्ण नेमका कसा होता बरे ? नाही... नाही सांगता येणार... पण मैत्रेयजींचा कृष्णमनोगतातील कृष्ण हाच खरा कृष्ण होऊन जातो... मनात घर करून राहतो.. आपले जीवन व्यापून टाकतो... आपल्या स्मृती मंजुषेत बंदिस्त होतो... तो आपला होऊन जातो... फक्त कृष्णापुढेच आपणं हात जोडतो असे नव्हे तर आपल्या नकळत आपण मैत्रेयजींपुढे ही नतमस्तक होतो... मैत्रेयजींच्या कौतुकास शब्द नाहीत... कृष्णमनोगत वाचणं हे केवळ मैत्रेयजींच्या जीवनाचे सार्थक होईल... असे नव्हे तर आपल्या ही जीवनाचे सार्थक होईल... कृष्णमनोगत हा वाचकांच्या जीवनाचा मोलाचा आनंदाचा ठेवा ठरणार आहे... आणि मैत्रेयजींसाठी ही आनंदाची शिदोरी असणारं आहे... वाचकांनी ही शिदोरीआ त्यांच्या पदरी घालावी... जेणेकरून वाचक आणि लेखक दोघेही कृतार्थ होतील...खर्या अर्थाने जीवनाचे सार्थक होईल... या खेरीज आणखीन काय हवे ?



शब्दांकन
विजया जक्कल
मो.८०१०९५७२७०

अस्तित्वावर असिम प्रेम करणारा... अस्तित्वाच्या ऊपहारबद्दल जन्मोजन्मीजन्मी ऋणी राहणारा, निसर्गाच्या सान्निध्यात रमणारा कृष्ण, बांसरीत फुंकर घालणारा कृष्ण, गोपिकांमध्ये रमणारा, राधेच्या सहवासात सुखावणारा, सवंगड्यांमध्ये हरवणारा कृष्ण, कुठल्याही समस्येला हसत सामोरी जाणारा कृष्ण, ज्याच्या जन्मापासूनच चमत्कारांची मालिकाच सुरू झाली...पण एकाही चमत्काराला मी जबाबदार नाही म्हणणारा कृष्ण, यशोधेचा कृष्ण.. राधेचा कृष्ण.. कालिया सर्पाला नेस्तनाबूत करणारा कृष्ण... बलरामाचा कृष्ण, सुदामाचा कृष्ण... रुक्मिणीचा तितकाचं सत्यभामेचा ही...सुभद्रेचा तितकाच दौपद्रीचा ही... कृष्णाचे कुठले रुप लक्षात ठेवायचे? अर्जूनावर मनस्वी प्रेम असलं तरी कर्णासाठी त्याचे हृदय द्रवत होतं...कर्णाविषयी ही तितकंच आत्मियता होती...

दुर्योधनाला ही सांभाळून घ्यायचा प्रयत्न केला... त्यात ही कसूर ठेवली नाही... कुठल्याही नात्यात कुचराई केली नाही.. कुठेही फसवेगिरी नाही, खोटेपणा नाही... अर्जूनाला गीता सांगणारा कृष्ण... तर खरं युद्ध तर तूच जिंकल आहेस असे म्हणून कर्णाला न्याय देणारा कृष्ण... सारे सैन्य दल दुर्योधनाच्या हवाली करुन त्याचे मनोबल वाढवणारा कृष्ण.... द्रौपदीचे रक्षण करणारा कृष्ण... कुंती इतकेच गांधारीला जपणारा कृष्ण... उध्दवाचा कृष्ण... सार्यांच्या भूमिकेला न्याय देणारा कृष्ण... प्रत्येक नात्याला जपणारा कृष्ण... प्रत्येकाला हवाहवासा वाटणारा कृष्ण.. प्रत्येकाला आपलासा भासणारा कृष्ण... असा हा विविधतेने नटलेला..सहस्र कलागुणांनी तरबेज असलेला कृष्ण...! अर्थातच मैत्रेयजींनी ऊभा केलेला कृष्ण आपला होऊन जातो..

कृष्ण मनोगताचे खास वैशिष्ट्य असे की कृष्णाचा अखेरचा क्षणं मैत्रेयजींनी असा टिपला आहे... कृष्णाचं मरणं आपल्याला जगणं शिकवून जातं... सरते शेवटी उद्धवाशी होत असलेल्या संवादातून त्यांनी असे काही तीरं सोडले आहेत विचारता सोय नाही... कृष्ण जन्मापासून त्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत (कृष्णा मार्फत) जे काही, जितकं म्हणून शिकवता येईल... तितकं जीवनामृत, ज्ञानामृत पाजण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे... असं म्हणनं ही चुकीचंच होईल.. कारण मैत्रेयजींनी सारं सारं अगदी सहजपणे केलं आहे.. या सार्याला तोड नाही.. फक्त हे सारं जाणण्याची समज हवी. आपल्याकडे ती दृष्टी हवी... त्या दृष्टीने आपण कृष्ण मनोगतात डोकाऊया !

वाचता वाचता पुस्तकाच्या शेवटच्या पानावर कधी येतो...? हेचं मुळी कळतं नाही... पुस्तक मिटतो... ! कृष्णाला निरोप देतांना अंतःकरण गलबललेलं असतं.... पापण्यांच्या कडा ओलावतात...मला तुम्ही तुमच्यात, स्वतः मध्ये पहावं असं सांगणारा कृष्ण आपल्यात कधी प्रवेश करतो कळतंच नाही... पुस्तकाच्या मिटलेल्या पानाबरोबर स्वतः मधील मी पण मिटल्याच्या जाणिवेने आपणं भानावर येतो... कृष्ण कुठेही गेलेला नसतो... आपण कृष्णात हरवून जातो!!.. नव्हे नव्हे आपण कृष्ण होऊन जातो ! आपणच कृष्ण होऊन रहातो...!!!

(समाप्त)

## खरी प्रसन्नता आपल्या अंतरी आहे - संत राजिन्दर सिंह जी महाराज

आपण आपल्या जन्मापासूनच दु:खी असावे असे इच्छित नाही. आपण नेहमी प्रसन्नता आणि समाधान प्राप्त करू इच्छितो. त्याकरिता आपण आपला परिवार, मित्र आणि प्रिय जनांवर प्रेम करतो आणि आपण त्यांच्याशी बंधुत्व भावाने व्यवहार करून त्यांच्यातच आपली प्रसन्नता शोधतो. आपण बाहय जगाच्या धन-दौलतीत आणि नातेसंबंधात सुद्धा खुशी शोधण्याचा प्रयत्न करतो. जर आपण याचे विश्लेषण केले तर आपल्या लक्षात येईल की, या सर्वांपासून आपल्याला काही वेळे करता खुशी मिळते, परंतु ठीक याच्या उलट धन-संपत्तीचा नाश आणि नातेसंबंध तुटल्याने आपल्याला अत्यंत क्लेश आणि दु:खाची सुद्धा अनुभूती होते.

उदाहरणार्थ, जर आपले घर आगीत जळाले तर, आपल्याला असे वाटते की आपण सर्वस्व गमाविले आहे. जर आपण करोडपती असू आणि अचानक आपले दिवाळे निघाले तर, आपण निराश होतो आणि जर आपल्या एखाद्या प्रिय जनाचा मृत्यू झाला तर, आपण शोकात डुबून जातो. पैसा, धन-दौलत इत्यादी आणि आपल्या प्रियजनांच्या जवळीकते मुळे जी खुशी आपणास मिळते, त्यांच्या दूर जाण्याने तीचे दु:खात रूपांतर होते.



जीवनाच्या कोणत्या न कोणत्या एखाद्या वळणावर आपणास याचा प्रत्यय अवश्य येतो की, या बाहय जगतातील सर्व खुशी अस्थाई आहेत. जो पर्यंत आपण या जगात प्रसन्नता शोधतो तो पर्यंत आपणास निराशाच पदरी पडेल कारण की, या भौतिक दुनियेत सर्व काही नश्वर आहे. अंती आपल्याला सुद्धा आपल्या भौतिक शरीराच्या अंताचा सामना करावा लागेल आणि आपले सर्व काही इथेच सोडून जावे लागेल. हीच दुनियेची जगरहाटी आहे. जीवनाच्या वास्तविकतेकडे पाहिल्यावर आपण असा विचार करू लागतो की या भौतिक जगात खरी प्रसन्नता प्राप्त करण्याची काही आशा आहे का? आपण या जगात स्थाई खुशी कशी आणि कुठे प्राप्त करू शकु?

शतकानुशतके महान संत महापुरुष सांगत आले आहेत की खरी खुशी बाह्य वस्तूमध्ये नाही तर, ती आपल्या अंतरिच मिळू शकते. शाश्वत खुशी प्रभूची अशी देणगी आहे जिला वायू, अग्नी, जल आणि पृथ्वी नष्ट करू शकत नाही. त्या प्रसन्नतेला आपल्यापासून कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. शाश्वत प्रसन्नतेचे केवळ एकमात्र साधन परमात्मा हेच आहे. सर्व संत महापुरुषांनी परमात्म्याला 'सत्, चिद् आनंद' स्वरूपात संबोधिले आहे. या महापुरुषांनी आपल्या अंतरी परमात्म्याचा अनुभव घेतला आणि याचा संदेश सर्व मानव जातीला दिला. त्यांनी आपणास शिकविले की, परमात्मा प्रेम, ज्योती आणि चैतन्याचा महासागर आहे. आपण सर्व आत्मे परमात्म्याचा अंश आहोत. जेव्हा आपण आपल्या वास्तव रूपाला ओळखतो, तेव्हा आपण आनंदाच्या स्रोताशी जोडले जातो. आनंदाच्या या स्रोताशी जोडले जाणे सोपे आहे, हा आपल्या केवळ ध्यानाचा विषय आहे. आपण जिथे पाहिजे, तिथे आपले ध्यान लावू शकतो. अध्यात्मिक गुरु आपल्याला ध्यान एकाग्र करण्याची कला शिकवितात. यामध्ये आपणांस आपले ध्यान दोन डोळ्यांच्या भृकुटी मध्ये शिवनेत्रावर टिकवावे लागते. यालाच ध्यानाभ्यास म्हटले जाते. जर आपण बाह्य जगापासून काही वेळा करिता ध्यान हटवून शिवनेत्रावर एकाग्र केले तर, आपण खुशी आणि आनंदाच्या स्रोता शी जोडले जातो, जे आपल्या अंतरी आपली प्रतीक्षा करीत आहेत.

दररोज दोन तास अशा प्रकारे ध्यान टिकविल्या ने आपण देह भासाच्या वर यायला शिकतो. सर्व साधारण पणे चैतन्याच्या प्रवाहाद्वारे आपल्या शरीराला दुनियेतील बाह्य गोष्टींची माहिती होते. जसे पहाणे, ऐकणे, चवघेणे, वास घेणे आणि स्पर्श करणे. इंद्रियांद्वारे आपण सुंदर दृश्य पाहतो, मधूर आवाज ऐकतो, सुगंधाचा आनंद घेतो, चविष्ठ भोजन करतो आणि स्पर्शेइंद्रिया द्वारे सुखद अनुभूती घेऊ शकतो. जर आपण आपल्या आत्म्याच्या चैतन्याच्या प्रवाहाला बाह्य जगतातून हटवून शिवनेत्रा वर एकाग्र केले तर दिव्यज्योती आणि श्रुती च्या एका नवख्या दुनियेचे दालन आपल्या करिता उघडले जाते. तेव्हा कुठे आपण आपल्या अंतरी प्रभूच्या ज्योती आणि श्रुती चा अनुभव करू शकू, जी सृष्टीची रचना करताना परमात्म्या पासून निघाली होती. जेव्हा आपला आत्मा प्रभु च्या चैतन्याच्या प्रवाहाच्या संपर्कात येतो, तेव्हा तो आपल्या स्रोत असणाऱ्या परमात्म्या जवळ पुन्हा परत जातो.

आत्मा स्थायी खुशीच्या यात्रेची सुरुवात ध्यान-अभ्यासाद्वारे करतो. आपला आत्मा सदैव चेतन आणि आनंदमयी अवस्थेत राहतो. जेव्हा आपण या अद्भुत प्रसन्नतेचा अनुभव करतो तेव्हा आपल्या भौतिक दुनियावी वासना कमी होऊ लागतात. जे लोक ध्यानाभ्यास करतात ते आपले ध्यान दुःखाच्या प्रसंगी सुद्धा प्रसन्नते च्या स्रोतावर टिकवून ठेवू शकतात. हे अगदी खरे आहे की अशा वेळी ते सुद्धा जीवनाच्या दुःख-क्लेश प्रसंगातून जातात परंतु, त्याच्या पासून ते प्रभावित होत नाहीत तर, आपल्या जीवनात येणाऱ्या प्रत्येक समस्येला ते सहजतेने सोडविण्यात सक्षम होतात. जेव्हा आपण ध्यान-अभ्यास करतो आणि आपल्या अंतरी प्रभू प्रेम आणि प्रसन्नतेचा सानिध्यात येतो, तेव्हा आपण हे इतरांना सुद्धा वाटायला सुरुवात करतो ज्यामुळे आपला जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो आणि आपण खऱ्या अर्थाने खरे मानव बनतो.

## शब्दकोडे-११५



आडवे शब्द

१.साक्षरतासाठी चालवले जाणारे एक अभियान ६.लोकमान्य टिळकांचा एक प्रसिध्द ग्रंथ ९.वाळु,माती १०.क्रिकेटमधील धाव ११.आई,जननी १२.कर्ता,करविणारा १४.हिंदीत घर १५.अर्धवर्तुळाकार आकार १६.न समजण्याजोगे,आकलन होणार नाही असे १८.जहाल विरूध्द २०.अस उलटे करा २२.ज्याच्यात जीव आहे असा २४.पंख २५.नाही म्हणने २७.दाहेव उलटे करा २९.भगवा चे व काढुन दा लावा ३१.धास्ती,धाकाची भिती ३३.शिवसैनिक ३४.एक प्रेमी युगल राजाराणी ३६.रोगपरिक्षा ३७.नवरदेव ३८.मासा,एक रास ४०.लायक नसलेला ४२.रसाने भरलेला ४४.तडजोड,व्यवस्था ४७.पवन,वात ४८.कपाळ,ललाट ५०.मर्त्य,मयत ५१.................. वार्ता विघ्नाची,श्रीगणेश आरतीची सुरूवात ५६.राजपुत्र,युवराज ५८.निघालेला,मार्गस्थ ५९.पावसाची वाट पाहणारा एक पक्षी ६०.अर्ध्या ओंजळीचे माप ६२.कामासह ६४.गडावरील पहारेकरी ६५.भुतकाळातला,गेलेल्या काळाचा ६९.दाबुन टाकण्याजोगे ७१.तुल्य,सारखा ७३.मऊ धोरणाचा७४.निकाल, निवाडा ७५.विवाहासाठी जमलेली मंडळी ७७.इंग्रजीतला विजेता ७८.सरळ, थेट ८०.नाडी,तपकीर८१.जंगल,वन,अरण्य८३.आलमारी ८४.पाठीमागचे दार८५.एकदम शांतता,स्तब्धता

उभे शब्द

१.संगीतातील सात स्वर २.घाव,जखम ३.नक्षत्र,चांदणी ४.एक गोड व आंबट फळ ५.याचना करणारा ६.हिंदुचा एक पवित्र ग्रंथ ७.कॉलम,खाना ८.प्रतिबंध,मना ११.मानलेला १३.राजाची बायको १४.घाण,कचरा १६.बदनामी,नामुष्की १७.मुरलीधराची आई १९.संपत्तीचा हक्कदार २१.सतत,अखंड २३.आयुष्य,पाणी म्हणजे .... २६.कावळयाचा रंग २८.नवरा,पती २९.प्रलयंकारी,अवाढव्य ३०.चाल,वेग ३२.लोखंड घासण्याचे साधन ३३.आईची बहीण ३५.मेलेला,मर्त्य ३९.चित्ताकर्षणासाठी केलेला हावभाव ४१.सनी देओल,अमिषा पटेल यांचा क वादग्रस्त चित्रपट ४३.र्ताजर उलटे करा ४५.हिंदीत तुम्ही ४६.दानव,राक्षस ४७.खबर,बातमी ४८.भाग देणारा ४९.कुल उलटे ५२.दुध आटवुन तयार होणारा एक पदार्थ ५३.पाठीचे मुख्य हाड ५४.शोक,व्यथा ५५.जड नसलेला ५६.रात्री उमलणारे एक फुलझाड ५७.पाठीचे मुख्य हाड,कना ६०.लोखंडाला स्पर्षाने सोने करणारा काल्पनिक गड ६१.हिंदीत कळी ६३.सहाय्यक,मदत करणारा ६५.हिंदीत दुख,डिंक ६६.पोळया भाजण्याचे साधन ६७.काळया पाठीचे हरीण ६८.पलंग विनण्याची कापडी पटटी ७०.मुसलमान ७२.मोठेपणा,महती ७६.पतन,पडणे ७९.दाट उलटे करा ८१.एक छोटे चार चाकी वाहन,जीप ८२.नविन,नवा

### शब्दकोडे ११४ चे उत्तर

**आडवे उत्तर**
१.अवघड ६.आजतागायत
१०.वरण ११.मजल दरमजल
१५.दहा १६.तारकस १७.दलाल
१९.वसन २२.राग २५.राळ
२६.हजरजबाबी २७.पातळसर
२९.वानर ३०.वात ३१.सम
३२.जवान ३३.पागा ३४.खाच
३६.रणगाडा ३७.कुलक्षणी
३८.पोरकटपणा ४१.माता
४२.पामर ४३.रण ४५.गवार
४७.राणी ४८.सराफ
४९.तळतळाट ५०.महोदय
५२.लवलव ५३.चाक
५५.आवरणे ५७.वमन ६०.वाटप
६२.लट ६३.नस ६४.सनदशीर
६६.लाथ ६७.काच ६८.गर्व
६९.बदक ७१.सय ७२.घट
७३.सरासरी ७४.ताटवा
७५.वर्तमानपत्र ७७.कुंपण
७८.बस्तान ७९.नयन ८०.साकड

**उभे उत्तर**
१.अवयव २.वर ३.घण
४.सांज ५.उदर ६.आज
७.जलद ८.गाफील ९.तळमळ
११.महाराज १२.लता
१३.रकमपात १४.मस
१८.लाचार २०.सहनशीलता
२१.नजर २३.गबाळ २४.आळस
२५.राजवाडा २८.समर
३०.वाचक ३२.जगावेगळा
३३.पाणी पाणी होणे ३४.खार
३५.कृपण ३७.कुमारी ३८.पोर
३९.टरफल ४०.कोर ४४.मळवट
४६.वाटचाल ४७.रामरस
४९.तलवार ५१.यवन
५४.कटकट ५६.वनचराई
५८.मद ५९.नशीबवान
६१.पलायन ६४.सर्व ६५.रद
६७.कासव ६८.गरीब ७०.कवन
७१.समान ७२.पत्रक ७४.तान
७६.पसा

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

जा.क्र./जे२/८१६/२०२२३
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय धुळे विभाग, धुळे
पिंगळे कॉम्पलेक्स, मोगलाई शाळा नं.१४ समोर, साक्री रोड धुळे ४२४००१
दिनांक ३१/०३/२०२३

## चौकशीची नोटीस

(सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, सन १९५० यांचे कलम ५० अ (१)

योजना अर्ज क्रं.२०९/२०२३

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था :- **श्री त्र्यंबकेश्वर महादेव मंदिर, कुवे ता. शिरपुर जि. धुळे**
नो. क्र. ए/७११/धुळे
सौ.अनिता दिलीप चौधरी व इतर - अर्जदार

सर्व संबधित लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त धुळे विभाग धुळे हे वर नमूद केलेल्या योजना अर्ज संबधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५०चे कलम ५० अ (१) अन्वये अर्जदाराने श्री त्र्यंबकेश्वर महादेव मंदिर, कुवे ता. शिरपुर जि. धुळे महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त कायदा १९५० चे कलम ५० अ (१) अन्वये न्यासाची योजना मंजुरी करीता प्रस्ताव दाखल करण्यात आलेला आहे. सदर योजनेतील मुदयावर चौकशी करणार आहेत.

अ). जंगम मिळकत :- (वर्णन) परिशिष्ट एक प्रमाणे
ब). स्थावर मिळकत :- (वर्णन) परिशिष्ट एक प्रमाणे

सदरच्या योजना प्रकरणात मध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यानी त्याची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील मुदतीत केफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुनचौकशी पुरी केली जाईल व योजना अर्जाचे निकालाबाबत योग्य आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व मी सहाय्यक धर्मादाय आयुक्त याचे शिक्कानिशी आज दिनाक २९/०३/२०२३ रोजी दिली.

व.लि.

**अधिक्षक न्याय शाखा**
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय धुळे विभाग धुळे

# अपात्र शिक्षक, मुख्याध्यापकांची नियुक्ती करणाऱ्या शाळांच्या संचालकांवर कारवाई करा

## पालकांचे शिक्षणाधिकारी यांना निवेदन

**नाशिक । प्रतिनिधी**

खाजगी स्वयंअर्थसहायित इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सवेच्या शर्ती) १९८१ च्या तरतुदीनुसार पात्रताधारक शिक्षक व मुख्याध्यापकांची नियुक्ती केली जात नसून अपात्र शिक्षक व या अपात्र शिक्षकांपैकी एकाला शाळेच्या मुख्याध्यापक पदाचा कार्यभार संस्था देत आहे. त्यात बहुतांश शिक्षक हे अप्रशिक्षित (अनट्रेंड) असून ही बाब बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ च्या तरतुदीचा भंग करणारी आहे. तरी अशा अपात्र शिक्षक, मुख्याध्यापकांची नियुक्ती करणाऱ्या शाळांच्या संचालकांवर कारवाई करा अशी मागणी पालकांनी शिक्षण अधिकाऱ्यांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की,

**इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मनमानी कारभार केला जात असून अपात्र कर्मचाऱ्याद्वारे विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जात असून खाजगी शाळा आर्थिक लाभासाठी मुलांच्या भवितव्याचा खेळ करीत आहे. असे गैरप्रकार तातडीने थांबविणे गरजेचे आहे.**
**- ॲड.अकिल सिम्ना -**
**कायदेशीर सल्लागार नाशिक पॅरेंटस असोसिएशन**




**खाजगी स्वयंअर्थसहायित इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडून अपात्र कर्मचाऱ्यांकडून दर्जाहीन शिक्षण दिलेबाबत आमचे निदर्शनास आले आहे. मुलांना दर्जेदार शिक्षण मिळविण्याचा हक्क असून शिक्षण विभागाने तात्काळ आपले स्तरावर आदेश करावे अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.**
**- निलेश साळुंखे - शिवसेना उपमहानगरप्रमुख तथा अध्यक्ष नाशिक पॅरेंटस असोसिएशन**

खाजगी स्वयंअर्थसहायित इंग्रजी माध्यमाच्या शाळांना शासनाने शाळा सुरु करतांना दिलेल्या मान्यता आदेश व इरादा पत्रातील अटी-शर्तीचा हेतुत: भंग करून शाळा व्यवस्थापन अपात्र उमेदवाराची नियुक्ती करून प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी यांच्याकडून वैयक्तिक मान्यता न घेता या अपात्र कर्मचाऱ्यांकडून मुलांना शिक्षण दिले जात असल्याचा आरोप पालकांकडून यावेळी करण्यात आला.

खाजगी स्वयंअर्थसहायित इंग्रजी माध्यमाच्या शाळाना सक्तीने महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सवेच्या शर्ती) १९८१ च्या तरतुदीनुसार अर्हता-पात्रता धारक शिक्षक नियुक्ती करणे व या शिक्षकांना वैयक्तिक मान्यता घेणे बंधनकारक करण्यात यावे. तसेच मुख्याध्यापक पदावर नियुक्त कर्मचाऱ्यास शासनाकडून वैयक्तिक शिक्षक मान्यता व मुख्याध्यापक पद मान्यता घेणे बंधनकारक करावे. मुख्याध्यापक नसलेल्या शाळांमध्ये शिक्षणाधिकारी (प्राथ, माध्य) यांच्याकडून स्वाक्षरीचे अधिकार प्रदान करतांना शासनाने विहित केलेल्या ३ महिन्याच्या कालावधीत सक्षम व्यक्तीची मुख्याध्यापक पदी नियुक्ती करण्यास मज्जाव करणाऱ्या शैक्षणिक संस्थेवर प्रशासक नियुक्त करण्यात यावे. सोबतच अपात्र कर्मचाऱ्यांना नेमणुका देवून कामावर ठेवत असतील अशा शाळा, संस्थावर बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम २०१२ नुसार कायदेशीर कारवाई करावी. अशा आशयाचे निवेदन शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक जिल्हा परिषद नाशिक यांना नाशिक परेंटस असोसिएशन कडून देण्यात आले आहे. यावेळी संघटनेचे अध्यक्ष निलेश साळुंखे, सचिव प्रदिप यादव, सदस्य सुयश पाटील, तज्ञ पालक हरिष वाघ, कायदेशीर सल्लागार अकिल सिम्ना, सदस्य नंदेश ढोले यांचेसह मंगेश पाटील, ॲड. मृत्युंजय कुटे, रितेश देव्हारे, राहुल कासार, रामराव पारधे, विजय सोनवणे, हर्षल पाटील, अन्वर जावेद शेख, पंकज सोनवणे, दीपक बच्छाव आदी पालक उपस्थित होते.

---

**ॲड. मिलींद एम. बाविस्कर धुळे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. ज्युडि. मॅजि. सो. वर्ग १ धुळे यांचे कोर्टात**

**फौ.कि.अर्ज नं.५५६/२०२३**

ताराचंद हिरामण जानी उ.व.: ५० वर्ष, व्यवसाय :- मजुरी,
रा. :- कुळथे, ता. जि. धुळे. .....**अर्जदार**
**विरुध्द**
म.ग्रामसेवक सो.
ग्रामपंचायत कार्यालय,
कुळथे, ता. जि. धुळे ...**सामनेवाला**

( चि. नितीन ताराचंद जानी याचा जन्म दि. १४/०७/२०१९)

ज्याआर्थी अर्जदाराने धुळे येथील मे. ज्युडी. मॅजि. वर्ग १ सो. धुळे दि. ०५/०७/२०२३ रोजी फ़ौ. कि. अर्ज. नं. ५५६/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदाराने जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे चि. नितीन ताराचंद जानी याच्या जन्माची नोंद करणेबाबत धुळे येथील मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौकशी दि. १८/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. न्यायदडांधिकारी सो. प्रथम वर्ग कोर्ट नं. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणा-या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :-०७/०७/२०२३

**कामगिरी कारकुन**
**मे.दिवाणी न्यायालय सो.**
**कोर्ट नं.**

(शिक्का)

**सहाय्यक अधिक्षक**
**मे.दिवाणी न्यायालय सो.**
**कोर्ट नं.**

---

**ॲड. क्रिष्णा एम. निमगडे, धुळे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश व. स्तर सो. यांचे न्यायालयात**

**दि.कि.अ. नं. ८१८/२०२३**

योगेश लालचंद पाटील वगैरे .....**अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** ...**सामनेवाला**
लालचंद राघो पाटील (मयत)
लालचंद राघो पाटील
ज्ञानेश्वर लालचंद पाटील- मयत
रेखा रामचंद्र पाटील- मयत ...**मयत**

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी मयत कै. लालचंद राघो पाटील यांचे मृत्युनंतर अर्जदार नं. १ ते ४ म्हणजेच हे १. योगेश लालचंद पाटील, उ.व. २९, धंदा- मजुरी, २. शुभांगी रामचंद्र पाटील, उ.व. १५, धंदा- शिक्षण, (अर्जदार नं. २ स्वत:साठी व अर्जदार नं. २ हीचे अ.पा.क. म्हणुन), ३. मंगलबाई लालचंद पाटील, उ.व. ६०, धंदा :- घरकाम, नं. १ ते ३ रा. इंदिरा नगर, सोनगिर, ता. जि. धुळे, ४. सोनि जितेंद्र पाटील, उ.व. ३२, धंदा- घरकाम, रा. चिंचाळा, ता. चोपडा, जि. जळगाव हे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत होवुन मिळणेकरिता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII चे कलम २ प्रमाणे Heirship Certificate (वारस दाखला) मिळणेकरिता सदर अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्या अर्थी सदर अर्जाबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास त्यांनी धुळे येथील मे.८ हे सह दिवाणी न्यायाधिश (क स्तर) यांचे न्यायालयात दिनांक- १६/०८/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः किंवा त्यांच्या वकीलांमार्फत हजर राहुन म्हणणे मांडावे. अन्यथा कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन गुणवत्तेच्या आधारे पुढील आदेश पारीत केले जातील. सदर जाहीर नोटीस या न्यायालयाच्या नावाने व शिक्क्यानिशी प्रसिध्द केली असे. धुळे

दिनांक- ०७/०७/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकुन**
**दिवाणी न्यायाधिश व. स्तर**
**धुळे**

(शिक्का)

**अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधिश व. स्तर**
**धुळे**

---

**ॲड.**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर यांचे कोर्टात**

**दि.कि.अर्ज.नं.७४७/२०२३**

१) अरूण शामराव पवार उ.वय.:-५५वर्ष,कामधंदा-शेती
२) अनिल शामराव पवार उ.वय.:-५२वर्ष,कामधंदा-मजुरी/शेती
३) किशोर शामराव पवार उ.वय- ४६वर्ष, कामधंदा-शेती
अर्जदार क्र १ व ३ रा. नंगाव ता.जि.धुळे .....**अर्जदार**
**विरुध्द**
कै.शामराव बारकु न्हावी (पवार) मृत्यु दिनांक २६/३/२०१८
मुत्यु ठिकाण नंगाव ता जि धुळे ...**सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार याने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे न्यायालयात दि. २३/०६/२०२३ रोजी दि. कि. अर्ज. नं. ७४७/२०२३चा अर्ज दाखल केलेला आहे ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. शामराव बारकु न्हावी (पवार) (मयत) याचे अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत असे घोषित होवुन मिळण्यासाठी व अर्जदार याना सदर वारस दाखला हा शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणर आहे. म्हणुन अर्जदार यानी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो क. स्तर यांच्या न्यायालयात अर्जदार क्र. १ ते३ याच्या नावाने वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. ०५/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर कोर्ट नं. ७, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही. ठिकाण :- धुळे

दिनांक : ०५/०७/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकुन**
**मे. दिवाणी न्यायालय सो.**
**कोर्ट नं..**

(शिक्का)

**अधिक्षक**
**मे. दिवाणी न्यायालय सो.**
**कोर्ट नं..**

---

**ॲड.**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर सो यांचे कोर्टात**

**दि. की. अ. क्र. ७९२/२०२३**

१) भिकन निळकंठ पाटील
२) उषाबाई सुरेश सोनवणे
३) मंगल छोटुलाल पाटील
४) शोभाबाई नाना पाटील
५) आशाबाई समाधान पवार
६) रंजनाबाई नारायण पवार .....**अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** ...**जाबदेणार**
कै. अंजनाबाई निळकंठ पाटील
मृत्युदि. २२/०३/२०२१ ...**मयत**

ज्याअर्थी अर्जदारांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट क. सो. यांचे कडे दि. ३०/०६/ २०२३ रोजी अर्जदार यांनी दि. की. अ. क्र. ७९२/२०२३ चा अर्ज कै. अंजनाबाई निळकंठ पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना मयताचे शासकीय व निमशासकीय कामासाठी मे.न्यायालयातुन अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखल मिळणे कामी सदर अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करीता पुढील चौकशी दि. ०७/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस,हीत चिंतक, वारस वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, या बाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठे स्तर कोर्ट सो. धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी. त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित तारखेपर्यत कोणचीही काहीही हरकत आली नाही. तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्या येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- १६/०६/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकुन**
**सह न्यायदंडाधिकारी प्रथम**
**वर्ग धुळे**

(शिक्का)

**अधिक्षक**
**सह न्यायदंडाधिकारी प्रथम**
**वर्ग धुळे**

---

**ॲड. विलास गोपिचंद भामरे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क.स्तर यांचे कोर्टात**

**दि.कि.अर्ज क्रं. ८०४/२०२३**

१) गौतम बाबुराव चव्हाण वगैरे ४ .....**अर्जदार**
**विरुध्द**
कै.बाबुराव भगा चव्हाण (मयत) ...**जाबदेणार**

**मुंबई रेग्युलेशन १८२७ ॲक्ट (भाग VIII) प्रमाणे वारस दाखला मिळण्यासाठी.**

या जाहिर नोटीसीव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, मयताचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदार नं. १ ते ५ यांनी सदरचा अर्ज केला आहे. मयत कै. बाबुराव भगा चव्हाण हे मौजे चितोड, ता.जि.धुळे येथे दि. १७/१२/२०२० रोजी मयत झाले आहेत. त्यांच्या वारसांनी कायदेशीर वारस म्हणून धुळे मे. सह दिवाणी न्यायाधीश सो. व. स्तर यांचे कोर्टात वारस दाखला मिळणेसाठी मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ भाग VIII प्रमाणे अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाचे कामी दि. १६/०८/२०२३ रोजी पुढील कार्यवाहीसाठी तारीख नेमण्यात आलेली आहे. सदर वारस दाखला बाबत कोणाचीही हरकत/म्हणणे असल्यास अगर अधिकार असल्यास त्यांनी चौकशीच्या दिवशी सकाळी १०.३० वाजता स्वतः अथवा वकिलामार्फत धुळे मे. दिवाणी न्यायाधीश सा. क. स्तर यांचे कोर्टात हजर होवून लेखी हरकत घ्यावी.

सदर दिवशी चौकशीचे कामी कोणाचीही काहीही हरकत न आल्यास चौकशीचे कामकाज पुर्ण होवून अर्जाचा निकाल दिला जाईल. कळावे,

आज दि.०४/०७/२०२३ रोजी आमच्या सही निशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिला आहे.

धुळे
दि.०४/०७/२०२३

**कामगिरी कारकुन**
**मे. दिवाणी न्यायाधीश सो .**
**क. स्तर, धुळे**

(शिक्का)

**अधिक्षक**
**मे. दिवाणी न्यायाधीश सो .**
**क. स्तर, धुळे**

---

**ॲड.**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर सो. धुळे यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ७५२/२०२३**

कारभारी रामचंद्र पाटील .....**अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** ...**सामनेवाला**
कै.सरूबाई रामचंद्र पाटील दि. ०७/०१/२०१४
मयताचा पत्ता:- धाडरे, ता. जि. धुळे ...**मयत**

ज्याअर्थी अर्जदार नं १ ते ५ यांनी कै. सरूबाई रामचंद्र पाटील यांचे कायदेशीर वारस आहे. असा वारस दाखला मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास ज्या कोणाची हरकत असेल त्यांनी आपली लेखी हरकत धुळे येथील मे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट नं ४ यांचे कोर्टात दि १०/०८/२०२३ रोजी सकाळी १०:३० वाजता मे. कोर्टात स्वतः किंवा वकिलामार्फत /प्रतिनिधीमार्फत हजर राहून सदरकामी आपले म्हणणे, तक्रारी व लेखी स्वरूपात हरकत सादर करावी. वरील तारखेस कोणाचीही लेखी स्वरूपात हरकत मे- न्यायालयात न आल्यास सदर कामी चौकशी होवून वरील अर्जात नं १ ते ५ यांना कै. सरूबाई रामचंद्र पाटील यांचे कायदेशीर वारस म्हणून बॉम्बे रेग्युलेशन अन्वये वारस दाखला (Legal Heirship Certificate) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कुणाचीही काहीही हरकत ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरची जाहिर नोटीस कोर्टाच्या सही/शिक्यानिशी आज दि.०१/०७/२०२३ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ०१/०७/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकुन**
**दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ**
**स्तर, धुळे**

(शिक्का)

**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ**
**स्तर, धुळे**

---

**ॲड. टी. एस. अमृतसागर**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**शिंदखेडा येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो. व.स्तर यांचे कोर्टात**

**दि. कि. अर्ज नं. १५४/२०२३**

१. प्रदिप झावरू पाटील उ.व.-५१ वर्ष, धंदा - मजुरी
२. माया प्रदिप पाटील उ.व.-४७ वर्ष, धंदा-घरकाम
नं. १ व २ रा. वायपुर, ता. शिंदखेडा, जि.धुळे. .....**अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** ...**सामनेवाला**
**आणि**
राकेश प्रदिप पाटील (मयत) मयत दि. २४/०३/२०२३,
मृत्यु ठिकाण: नरडाणे, ता. शिंदखेडा, जि. धुळे ...**मयत**

ज्याअर्थी अर्जदार यांनी उपरोक्त न्यायालयात राकेश प्रदिप पाटील (मयत) यांचे अर्जदार नं. १ व २ हे कायदेशीर वारस असून वारस दाखला हा शासकीय-निमशासकीय कामासाठी व इतर खाजगी कामासाठी आवश्यक असल्याने तसा वारस दाखला मिळणेसाठी दि. १९/६/२०२३ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. ११/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास शिंदखेडा येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. वरिष्ठ स्तर कोर्ट नं. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तकारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण- शिंदखेडा
दिनांक :- २३/६/२०२३

**कामगिरी कारकुन**
**दिवाणी न्यायालय सो. व.**
**स्तर, शिंदखेडा**

(शिक्का)

**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय सो. व.**
**स्तर, शिंदखेडा**

---

**ॲड. टी. एस. अमृतसागर**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**शिंदखेडा येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो. व.स्तर यांचे कोर्टात**

**दि. कि. अर्ज नं. १५५/२०२३**

१. साहेबराव मकन शिरसाठ उ.व.-५२ वर्ष, धंदा-मजुरी
२. रेखाबाई साहेबराव शिरसाठ उ.व.-४९ वर्ष, धंदा-घरकाम
नं. १ व २ रा. वायपुर, ता. शिंदखेडा, जि.धुळे .....**अर्जदार**
**विरुध्द**
**कोणीही नाही** ...**सामनेवाला**
**आणि**
समाधान साहेबराव शिरसाठ (मयत) मयत दि. २४/०३/२०२३,
मृत्यु ठिकाण-नरडाणे, ता. शिंदखेडा, जि. धुळे ...**मयत**

ज्याअर्थी अर्जदार यांनी उपरोक्त न्यायालयात समाधान साहेबराव शिरसाठ (मयत) यांचे अर्जदार नं. १ व २ हे कायदेशीर वारस असून वारस दाखला हा शासकीय-निमशासकीय कामासाठी व इतर खाजगी कामासाठी आवश्यक असल्याने तसा वारस दाखला मिळणेसाठी दि. १९/६/२०२३ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. ११/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास शिंदखेडा येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. वरिष्ठ स्तर कोर्ट नं. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थ मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- शिंदखेडा
दिनांक :-२३/६/२०२३

**कामगिरी कारकुन**
**दिवाणी न्यायालय सो. व.**
**स्तर, शिंदखेडा**

(शिक्का)

**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय सो. व.**
**स्तर, शिंदखेडा**

## न्यूज कॉलम

### गुरुंना विद्यार्थ्यांकडून सरगम अर्पण

**धुळे ।** संगीत, गायन, वादन, नृत्य या ललित कलाक्षेत्रात गुरु - शिष्य परंपरेला सर्वोच्च स्थान आहे. नंदकुमार देशपांडे संचलित सरगम म्युझिक अकादमीमध्ये काल गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. सकाळपासून रात्रीपर्यंत माजी - आजी विद्यार्थ्यांनी येऊन आपल्या सांगितिक गुरूंना त्यांनीच शिकवलेली सरगम अर्पण केली. पंचवटी कारंजाजवळ, लक्ष्मीबाळ सदन येथील सरगम म्युझिक अकादमीमध्ये यावेळी मनाली गर्गे, सुगंधा शुक्ल, वैशाली शुक्ल ,सानिका जैन, प्रीती पाठक , नीलिमा टकले, सुवर्णा यादव, रवींद्र मानकर, अनुष अक्कर, सुभाष सावरेकर, प्रकाश रत्नाकर, धनंजय भावसार यांनी हार्मोनियम वादक आणि गायक नंदकुमार देशपांडे यांना उद्देशून गुरुभक्तीपर गाणे सादर केले.

### जयश्रीबेन अमरिशभाई पटेल स्कूल मध्ये गुरुपौर्णिमा साजरी

**शिरपूर ।** शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित वाघाडी ता. शिरपूर येथील जयश्रीबेन अमरिशभाई पटेल सीबीएसई स्कूल मध्ये गुरुवार ३ जुलै रोजी गुरु पौर्णिमा साजरी करण्यात आली. आपल्या गुरूंविषयी कृतज्ञता, आदरभाव व्यक्त करण्यासाठी गुरुपौर्णिमा कार्यक्रमाचे आयोजन शाळेत करण्यात आले. त्यानंतर सर्व शिक्षक -शिक्षिकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूंविषयी आदर व्यक्त करत एक सुंदर नृत्य सादर केले.

# शिक्षक दरबार: आमदार दराडेंसमोर शिक्षकांनी वाचला तक्रारींचा पाढा

**धुळे । प्रतिनिधी**



शिक्षकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी गुरुवारी नाशिक विभागाचे शिक्षक आमदार किशोर दराडे यांच्या उपस्थितीत शिक्षक दरबार झाला. या दरबारात आमदार दराडे यांच्यातर्फे त्यांचे विश्वासू संभाजी पाटील यांनीच अधिकाऱ्यांना सूचना देण्याचे काम केले. मेळाव्यात शिक्षकांच्या समस्यांचा जागेवर निपटारा झाला. अनुकंपा धारकांना नियुक्ती आदेश देण्यात आले. शहरातील चावरा हायस्कूलमध्ये हा दरबार झाला.

या वेळी सहाय्यक शिक्षण संचालक एस. बी. सोनवणे, शिक्षणाधिकारी मोहन देसले, राकेश साळुंखे, जळगाव येथील संभाजीराव पाटील, मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष आर. व्ही. पाटील, सचिव उदय तोरवणे, संजय पवार, महेश मुळे, भरतसिंग भदोरीया, शालिक बोरसे उपस्थित होते. किशोर दराडे आमदार झाल्यावर पहिला मेळावा जे. आर. सिटी शाळेत झाला होता. त्यानंतर चार वर्षांनी मेळावा झाला. आमदार दराडे यांनी दरबाराचे उद्घाटन केल्यावर सर्व सूत्र संभाजी पाटील यांनी हातात घेतले. अकरा विषयांवर चर्चा झाली. त्यात वैयक्तिक मान्यतांचा विषय होता. शिक्षणाधिकारी देसले म्हणाले की, वैयक्तिक मान्यतेचे मार्च २०१७ पूर्वीचे प्रस्ताव प्रलंबित नाही. अनुकंपाचे ५७ पैकी ५० मान्यता मंजूर आहे. या वेळी एकवीरा देवी विद्यालयातील छाया कुवर यांच्या वैयक्तिक मान्यतेबाबत त्यांच्या पतीने कैफियत मांडली. या विषयी संभाजी पाटील यांनी विचारणा केल्यावर दोन दिवसांत मान्यता देण्यात येईल, असे आश्वासन शिक्षणाधिकारी देसले यांनी दिले. अनुकंपा धारकांना तातडीने नियुक्ती देण्याचे आदेश झाले. कमलाबाई शाळेतील दोन शिक्षकांना वेतन सुरू करण्याची सूचना झाली. अनुकंपा तत्वावरील एका अनुसूचित जमातीच्या उमेदवाराला आमदार दराडे यांच्या हस्ते नियुक्ती आदेश देण्यात आले.

आमदार दराडे म्हणाले की, शिक्षक मतदार संघ मोठा आहे. सर्वांच्या अडचणी समजून घेत त्या सोडवण्याचा प्रयत्न असल्याचे ते म्हणाले. योजना विभागाच्या शिक्षणाधिकारी पुष्पा पाटील मेळाव्याला गैरहजर होत्या. त्या मुळे त्यांच्या विरोधात हक्कभंगाचा प्रस्ताव मांडण्याचा इशारा देण्यात आला.

#### मुख्याध्यापक नियुक्तीवर तोडगा

**शाळांमध्ये मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षकांच्या नियुक्तीवर तिढा निर्माण होतो. त्यावर शिक्षणाधिकारी देसले यांनी मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक नियुक्तीचे आदेश प्रलंबित नाही. ज्या संस्थांमध्ये या विषयी तिढा आहे, तेथे नियुक्ती रखडली असून, त्यावर तोडगा काढण्याची सूचना त्यांनी केली.**

# गंगापूररोडवरील एनडीएमव्हीपी कॉलेज येथे युवती सेनेच्या शाखेचे उद्घाटन



**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक शिवसेना युवती सेनेच्या एनडीएमव्हीपी कॉलेज, गंगापूर रोड येथील शाखेचे उद्घाटन जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, महानगर प्रमुख प्रविण तिदमे, युवतीसेना कोअर कमिटी सदस्य महाराष्ट्र राज्य स्नेहल कांबळे, युवतीसेना जिल्हाप्रमुख हर्षदा गायकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या शाखेच्या शाखाप्रमुखपदी अर्चना चौधरी, उप शाखाप्रमुखपदी निशा नंदन यांची निवड करण्यात आली.

युवती सेनेची ही फक्त शाखा नसून युवतींच्या न्याय हक्कांसाठी काम करणारी, अन्यायाविरुद्ध लढणारी शाखा असेल असे जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांनी यावेळी सांगितले. या शाखेच्या शाखाप्रमुख अर्चना चौधरी, उपशाखाप्रमुख निशा नंदन यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

या प्रसंगी युवतीसेना उपजिल्हाप्रमुख हर्षदा दिवटे, जिल्हासंघटक अनुजा चव्हाण, महानगर प्रमुख स्नेहा शिरसाठ, उपमहानगर प्रमुख इंद्रायणी पळसकर, मध्य जिल्हाचिटणीस शीतल भवर, पश्चिम जिल्हा चिटणीस प्राची पवार, मध्य जिल्हा समन्वयक योगिता ठाकरे, पश्चिम जिल्हा संघटक स्वरूपा राऊत, विभाग प्रमुख साक्षी बोरस्ते, शिवसेना उपजिल्हाप्रमुख दिगंबर मोगरे, अमोल सूर्यवंशी, युवासेना जिल्हाप्रमुख रुपेश पालकर, अंबादास जाधव, मध्य नाशिक विधानसभा प्रमुख रोषण शिंदे, उप महानगर प्रमुख उमेश चव्हाण, संदीप गायकर, युवासेना पूर्व नाशिक विधानसभा प्रमुख आकाश कोकाटे आदी शिवसेना युवासेना, युवतीसेना पदाधिकारी उपस्थित होते.

# कळगांव येथे विद्यार्थ्यांना राजेश सोनवणे यांच्यातर्फे शैक्षणिक साहित्य वाटप



**धुळे ।** कळगांव येथे शाळेतील सर्व मुलांना राजेश सोनवणे यांच्या तर्फे लेखन साहित्य वाटप करण्यात आले. प्रामुख्याने कुरुकवाडे केंद्राचे केंद्र प्रमुख अरविंद पाटील हे उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या शुभ हस्ते लेखन साहित्य ज्यात शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना एक चार रेघी वही, एक चौकोनी वही, एक दुरेघी वही, कंपास पेटी, पेन्सिल, पेन, रबर, सचित्र बालमित्र पुस्तक इ. साहित्याचा समावेश आहे.

केंद्र प्रमुख अरविंद पाटील यांनी त्यांच्या मनोगतात म्हटले कि आपले जिल्हा परिषदेचे मुले हे बहुतेक गरीब घरातील असतात त्यांच्या साठी हे साहित्य खुपचं मोलाचे ठरेल, ज्यातून मुल आपली गुणवत्ता अजून वाढवू शकतात, त्यांच्या मनोगतात त्यांनी राजेश सोनवणे यांची मनभरून स्तुती केली. त्यांनी सांगितले की खुपचं कमी शिक्षक असतात की जे ज्ञानदानासोबत पैसे देखील मुलांसाठी खर्च करतात त्यातील सोनवणे हे आमचे एक निष्ठावान शिक्षक आहेत त्यांच्या ह्या कार्याचे कौतुक देखील केले. खाजगी शाळा व सरकारी शाळा यामध्ये एक प्रमुख फरक साधने व संसाधने याचा असतो. साधने व संसाधने यांच्यावर गुणवत्ता अवलंबून असते व गुणवत्तेमुळे साधने व संसाधने यांचा उत्कृष्ट वापर करता येतो, हे दोघे गुणवत्ता विकासाला पूरक आहेत.जर साधने व संसाधने उत्कृष्ट पद्धतीचे पुरवले गेलेत व त्यांचा सुयोग्य वापर केला तर ग्रामीण शैक्षणिक गुणवत्ता देखील अजुन उत्कृष्ट होवु शकते, हा माझा वैयक्तिक अनुभव आहे असे राजेश सोनवणे यावेळी म्हणाले. ह्या कार्याचे कौतुक शिक्षण विभागातील गट शिक्षण अधिकारी पाटील व इतर अधिकारी यांनी देखील कौतुक केले व पुढील गुणवत्ता वाढण्यासाठी शुभेच्छा दिल्या. जि प कळगांव ही शाळा ह्या वर्षापासून सेम इंग्लिश असून ग्रामीण भागातील विशेष करुन तापीकाठातील ही पहिली जि प शाळा आहे.

# तात्काळ आणि योग्य उपचारांमुळे कोब्रा चावलेल्या मुलाचे वाचले प्राण

**नाशिक । प्रतिनिधी**



८ वर्षांचा मुलगा त्यांच्या शेतातील (वजीरखेडे, ता. मालेगाव) घरी अभ्यास करत असताना, जमिनीवरून पेन्सिल उचलते वेळी त्याच्या डाव्या हाताच्या तर्जनीला साप चावला. आईने, शेजारी शेवाळे यांना मदतीसाठी हाक मारली आणि त्यांनी मुलाला उचलून डॉ वीरेंद्र पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे सिव्हिल हॉस्पिटल, मालेगाव येथे धाव घेतली.

तेव्हा सुदैवाने बालरोगतज्ञ डॉ. अभय पोतदार ते तिथे उपस्थित होते त्यांनी ताबडतोब बाळाला सर्प दंशवरील औषध, निओस्टिग्माइन सुरू केले. त्यानंतर बाळाला मालेगाव येथील खाजगी रुग्णालय प्रयास हॉस्पिटल येथे व्हेंटिलेटर आणि पुढील उपचारासाठी हलविण्यात आले. तेथे डॉ. पियुष रणभोर यांनी पुढील उपचार सुरू केले. परंतु नातेवाईक खूप चिंताग्रस्त असल्यामुळे (सुमारे १ वर्षापूर्वी कुटुंबातील एका मुलाचा साप चावल्यामुळे मृत्यू झाला) आणि मुलाला नाशिक येथील रुग्णालयात केंद्रात हलवण्याचा आग्रह धरला.

मुलाला नाशिकच्या साफल्य हॉस्पिटलमध्ये पाठवले. वाहतुकीदरम्यान मुलावर औषधोपचार सुरूच ठेवले होते. साफल्य रुग्णालयात, मुलाला यांत्रिक व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले आणि त्याला इतर सहाय्यक उपचार देण्यात आले. तीन दिवसांच्या स्थिरीकरणानंतर मुलाला व्हेंटिलेटर वरून बाहेर काढण्यात आले. मुलाने उपचाराला चांगल्या स्वरूपात प्रतिसाद दिला. त्याला नंतर अशक्तपणा जाणवला नाही, श्वास घेण्यात अडचण आली नाही आणि बोलणे देखील सामान्य झाले. ३ दिवसांच्या निरीक्षणानंतर मुलासह कुटुंबातील सर्व सदस्यांच्या आनंदी आणि हसऱ्या चेहऱ्याने मुलाला घरी सोडण्यात आले.

# आयमा व यंग इंडियन्सच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी वाय २० मंथन शिबिर

**नाशिक । प्रतिनिधी**

अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (आयमा), यंग इंडियन्स आणि केंद्र सरकारच्या युवक कल्याण व क्रीडा मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने नाशकात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विविध क्षेत्रातील युवा उद्योजकांसाठी प्रेरणादायी वाय २० मंथन शिबिर शनिवार दि.८ जुलै रोजी आयमाच्या सभागृहात सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आले आहे. अशी माहिती यंग इंडियन्स, नाशिकचे चेअरमन वेदांत राठी यांनी दिली.

यावेळी आयमाचे अध्यक्ष निखिल पांचाळ, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, पॉला मॅकग्लेन आणि सुनील खांडबहाले हे मार्गदर्शन करणार आहेत. हा पहिलाच मोठा कार्बन न्यूट्रल उपक्रम नाशकात होत असल्याने उद्योग विश्वात आनंदाचे वातावरण आहे. कोणत्याही जी २० इव्हेंटपेक्षा भव्य दिव्य असे या कार्यक्रमाचे स्वरूप राहणार आहे. उद्योग व प्रशासकीय क्षेत्रातील युवा मान्यवर यात आपले अनुभव कथन करून तरूण उद्योजकांशी थेट संवाद साधणार आहेत. त्यामुळे युवा व उदयोन्मुख उद्योजकांना उद्योग क्षेत्रात नव्या उमेदीने कार्य करण्याची नवी प्रेरणा मिळेल. तसेच यामुळे उद्योग जगतात नवे कृतीशील पर्व सुरू होऊन रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध होतील. कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहावे,असे आवाहनही राठी यांनी केले.

# आर्किटेक्ट्स आणि इंजिनिअर्स असोसिएशनतर्फे दीपक देवरे यांना जीवन गौरव पुरस्कार

**नाशिक । प्रतिनिधी**



आर्किटेक्ट्स आणि इंजिनिअर्स असोसिएशन, नाशिक संस्थेतर्फे नरेंद्र भुसे यांच्या अध्यक्षेत यंदाचे जागतिक आर्किटेक्ट्स दिनाचे औचित्य साधून दि.१ जुलै रोजी वैराज कलादालन, नाशिक येथे संस्थेचे माजी अध्यक्ष व शहरातील जेष्ठ, नामवंत देवरे-धामणे आर्किटेक्ट्स असोसिएट्स, नाशिक, या जोडीतील जेष्ठ आर्किटेक्ट दीपक देवरे यांना वास्तुकलेतील त्यांच्या उत्तुंग कामगिरीबद्दल संस्थेतर्फे जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्रमुख पाहुणे प्रख्यात कृष्णभुषण महाशब्दे, अध्यक्ष नरेंद्र भुसे, उपाध्यक्ष शीतल चौगुले, सचिव राजेंद्र बिर्ला, खजिनदार राजेंद्र पवार, सहसचिव नकुल भावसार यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन दीपक देवरे यांना सन्मानित करण्यात आले. तसेच देवरे यांच्या पत्नी अनिता देवरे यांचा देखील कांचन गडकरी यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते द्विप प्रज्वलन करून स्वागतपर भाषणांत अध्यक्ष नरेंद्र भुसे यांनी संस्थेबाबत सविस्तर माहिती देवून संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यशाळा, व्याख्यान, सेमिनार, प्रेझेंटेशन, साईट व्हिजिट, बक्षीस समारंभ, सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्यदायी कार्यक्रमांबद्दल उपस्थितांना अवगत केले.

देवरे यांच्याशी गप्पागोष्टींमध्ये चंद्रकांत धामणे, अरुण काबरे, बाळासाहेब मगर यांनी सहभाग घेतला. तसेच जेष्ठ सभासद डॉ. सुनील कुटे, रविंद्र लोहाडे, विजय सोहनी, सुरेश गुप्ता, आर्कि. रसिक बोथरा, माजी अध्यक्ष रवींद्र कुमार सिंग, सचिन गुळवे, योगेश कासार-पाटील, स्मिता कासार-पाटील जेष्ठ व मान्यवर सभासदांनी आपले मनोगत व्यक्त केले.

संस्थेचे उपाध्यक्ष शीतल चौगुले, सचिव राजेंद्र बिर्ला, सहसचिव नकुल भावसार, खजिनदार राजेंद्र पवार, कार्यकारिणी सदस्य मनोज गुप्ता, अमित सानप, योगेश महाजन, हर्षद भामरे, अजित कुलकर्णी, मनिष नवापारिया, अंकित मोहबंसी, सचिन मोरे, मंजिरी मोहबंसी, कांचन गडकरी, स्मृती ठाकुर, अनिल कठपाल, मृणाल गरुड यांच्यासह संस्थेचे माजी अध्यक्ष चारूदत्त नेरकर आणि ज्येष्ठ सभासद उपस्थित होते. कार्यक्रमास असोसिएशन ऑफ कन्सल्टींग सिव्हील इंजिनिअर्स, इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष विजय सानप, नाशिकचे चेअरमन अनिल कडभाने, प्रॅक्टिसिंग व्हॅल्यूअर असोसिएशन, इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनील भोर व इतर पदाधिकारी देखील उपस्थित होते.

# कोळशापाणी येथे अपघातातील मयत कुटुंबीयांचे सांत्वन करून दिली मदत

**शिरपूर । प्रतिनिधी**



तालुक्यातील पळासनेर व कोळशापाणी येथे आ. काशिराम पावरा व भूपेशभाई पटेल यांनी अपघातातील मयत कुटुंबीयांचे सांत्वन करून तातडीची मदत दिली. पळासनेर जवळ चारणपाडा येथील दोन दिवसापूर्वीच्या अपघाती दुर्दैवी घटनेने शिरपूर तालुक्यासह संपूर्ण राज्यभरात, देशभरात सुन्न करणारी घटना घडली. यात १० निष्पाप जणांचा जीव गेला असून २८ जण जखमी झाले आहेत. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

सदर घटना घडली असताना माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल व माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल हे मुंबईला असल्यावर तेथून त्यांनी मदतीसाठी मोठ्या प्रमाणात सहकार्य केले. आमदार काशिराम पावरा व अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते हे देखील मदतीसाठी पुढे सरसावले होते. या घटनेतील मयत व्यक्तींच्या कुटुंबाचे सांत्वन करण्यासाठी तसेच जखमींना व त्यांच्या कुटुंबीयांना मदत करण्यासाठी माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल हे मुंबई येथून विमानाने इंदोर व इंदोर येथून पळासनेर व कोळशापाणी येथे दाखल झाले. सर्व मयतांच्या कुटुंबीयांना घरोघरी जाऊन भेट घेऊन त्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला व सांत्वन केले. मयत झालेल्या व्यक्तींच्या प्रत्येक कुटुंबाला रोख ३० हजार रुपये घरोघरी जाऊन देण्यात आले. तसेच दोन-दोन महिन्यांचे याप्रमाणे एकूण सहा महिन्यांचे राशन तातडीने देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच मयत कुटुंबातील मुलामुलींच्या शिक्षणाची सोय आर. सी. पटेल आश्रम शाळेत करण्याची व्यवस्था करण्यात येत असल्याचे भूपेशभाई पटेल यांनी जाहीर केले. तसेच धुळे व शिरपूर येथील विविध शासकीय रुग्णालयांमध्ये उपचार घेत असलेल्या अपघातग्रस्तांना व जखमींना गरजेनुसार मुंबई, नाशिक येथील खाजगी रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात येणार आहे.

शासन स्तरावरून जाहीर झालेली मदत देखील लवकरात लवकर मिळण्यासाठी पाठपुरावा करून, विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आमदार काशिराम पावरा व भूपेशभाई पटेल यांनी यावेळी सांगितले. गुरुवारी ६ जुलै २०२३ रोजी दुपारी ४ वाजता शिरपूर तालुक्याचे आमदार काशिराम पावरा, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, माजी नगराध्यक्ष प्रभाकरराव चव्हाण, सांगवी पोलीस स्टेशन एपीआय राजेश खलाणे, धुळे जिल्हा परिषद उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, शिरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती के. डी. पाटील, जिल्हा परिषद समाज कल्याण सभापती कैलास पावरा, पंचायत समिती सभापती प्रतिनिधी वसंत पावरा, स्वीय सहाय्यक अशोक कलाल, जिल्हा परिषद सदस्य जयवंत पाडवी, रमण पावरा, योगेश बादल, पंचायत समिती उपसभापती विजय बागुल, पळासनेर येथील सरपंच छोटू कोळी, सतिश वाणी, पंचायत समिती सदस्य मानसिंग पावरा, कमलेश जयसवाल तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच, ग्रामस्थ, कार्यकर्ते, भूपेशभाई पटेल फ्रेंड सर्कल उपस्थित होते.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था
Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438, प्रा.भूषण पाटील: 7709100798
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518, सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र





शनिवार, दि. ८ जुलै २०२३

# मनपाच्या सहाही विभागात अतिक्रमण विभागाची कारवाई
















नाशिक

। नाशिक महापालिकेच्या पंचवटी, पश्चिम, पूर्व, सातपूर, नवीन नाशिक आणि नाशिक रोड विभाग या सहाही विभागात काल दि. ६ रोजी अतिक्रमण विभागाने अनधिकृत पथविक्रेत्यांवर कारवाई केली. पंचवटी विभागात आरटीओ ते राहू हॉटेल बोरगड मार्गावर कारवाई करुन अनधिकृत विक्रेत्यांना हटविले. यावेळी जाहिरात फलकही जप्त करण्यात आले. दोन गाडी भरुन साहित्य जप्त करण्यात आले. जप्त केलेल सदर साहित्य अतिक्रमण विभागाच्या आडगाव येथील गोडाऊनमध्ये जमा करण्यात आले. मनपा प्रभारी आयुक्त तथा प्रशासक भाग्यश्री बानायत यांच्या आदेशानुसार अतिक्रमण विभाग उपायुक्त करुणा डहाळे यांच्या निर्दे शानुसार कारवाई करण्यात आली. पंचवटी विभागात अशी कारवाई एक दिवसा आड करणार असल्याची माहिती पंचवटी विभागीय अधिकारी योगेश रकटे यांनी दिली. योगेश रकटे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाचे निरीक्षक प्रवीण मोरे, पथक प्रमुख उमेश खैरे यांनी कारवाई केली. नागरिकांनी स्वत:हून अनधिकृत बांधकामे, पत्र्याचे शेड, टप-या अशा प्रकारचे अतिक्रमण काढून घेण्यात यावे. अन्यथा अतिक्रमण पथकाद्वारे कारवाई करण्यात येईल तसेच रस्त्यावरील विक्रेत्यांवरही कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण विभाग उपायुक्त करुणा डहाळे यांनी दिला आहे. अतिक्रमण निरीक्षक विकी जाधव, प्रभाकर बागुल, जिवन ठाकरे, विनायक जाधव, सुनील कदम, जावेद शेख यांचा कारवाईत सहभाग होता. नाशिकरोड येथेही काल शिवाजी चौक आणि विभागीय कार्यालयाच्या आजूबाजूच्या अनधिकृत फळविक्रेते यांना हटविण्यात आले. तसेच सातपूर आणि नवीन नाशिक विभागातही वाहतुकीस अडथळा ठरणारे अनधिकृत फेरीवाले, भाजी विक्रेते, फळ विक्रेते यांच्यावर कारवाई करण्यात येऊन वाहतुकीचा मार्ग मोकळा करण्यात आला.

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र





# धुळे शहरात पावसाची जोरदार हजेरी















धुळे । शहरात अपेक्षेप्रमाणे

अद्याप पावसाला सुरुवात झालेली नाही. जिल्ह्यात गावांमध्ये अद्याप पेरणीयोग्य पाऊस झालेला नाही. मुसळधार पावसाचा इशारा देऊनही पावसाने तीन दिवस उघडीप दिली होती. धुळे शहरात पावसाने हजेरी लावली आहे. पावसाचा अंदाज घेत जिल्ह्यात आतापर्यंत पेरण्या शेतकरी करत आहेत. जिल्ह्यात वातावरण अंशतः ढगाळ आहे. अपेक्षेप्रमाणे अद्याप पावसाला सुरुवात झालेली नाही. पाऊस सुरू होण्यास विलंब झाल्यामुळे पेरण्यांना उशीर झाला आहे. पावसाचे प्रमाण कमी असल्याने रोपलागणीची कामे खोळंबली आहेत. ज्या शेतकऱ्यांनी पेरणी केली आहे त्या शेतकऱ्यांचे बियाणे वाया जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पाऊस उशिरा झाल्यामुळे मुळातच शेतकरी उदासीन होता. त्यातच पावसाने धुमाकूळ घातल्यामुळे शेतीच्या कामात व्यत्यय येत असल्यामुळे यंदा भातशेती लागवडीचे प्रमाण घटेल, असा अंदाज शेतकरी वर्तवीत आहेत. एकंदरीत मागील वर्षी जुन अखेर खरीप पेरणीचे कामे आटोपून बहुतांशी वारकरी हे पांडुरंगाच्या भेटीसाठी दिंड्यामध्ये सहभागी झाले होते. यावर्षी मात्र चित्र वेगळंच निर्माण झाल्याने शेतकर्यांच्या गोटात चिंतेचे ढग दाटू लागले आहेत. त्यातच अद्यापही उष्णतेची काहिली कमी झालेली नाही. दरवर्षीपेक्षा यंदा उष्णतेतील आर्द्रतेचे प्रमाण कमाल दिसून आले. एवढे ऊन व उष्णता कधीच जाणवली नसल्याचे जुने जाणते सांगतात. त्यातच पावसाळ्याच्या सुरुवातीलाच भयंकर चक्रीवादळाचा तडाखा बसल्याने पावसाबाबत तर्कवितर्क लावले जात आहे. जर पाऊस लांबला तर शेतकर्यांना याचा मोठा फटका बसणार आहे. यावर्षी रोहिणी, आर्द्रा व आता मृगही कोरडा जात असल्याने सर्वांचीच चिंता वाढली आहे .

ग्राउंड रिपोर्ट : पुरुषोत्तम पाटील